REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# संत साहित्यातील निसर्गसंवेदन

डॉ.कविता मुरुमकर

**प्रस्तावना :**

**'वृक्ष वल्ली आम्हां सोयरी वनचरे**
**पक्षी ही सुस्वरे आळविती**
**येणे सुखें रुचे एकांताचा वास**
**नही कळो येत दु:ख अंगा**
**आकाश मंडप प्रर्थिवी आसन**
**रमे तेथे मन क्रीडा करी'**

संत तुकारामाचा हा अभंग पर्यावरण संवेदनविचार मांडणारा आहे. वृक्ष, पशु पक्षी हे सगे सोयरे आहेत. त्यांच्या सोबतचा एकांत तुकारामांना प्रिय आहे. आकाश मंडप आणि पृथ्वी आसन आहे. तिथेच तुकारामाचे मन रमते. निसर्ग संवेदनेचा जागर या अभंगातून प्रतित होतो. संत साहित्यातून दिसून येणाऱ्या निसर्गसंवेदनेची, पर्यावरणीय जाणिवेची बीजे भारतीय संस्कृतीतील पंचमहाभूतांना परमेश्वर स्वरुप मानण्याच्या तत्वविचारात दिसून येतात.

पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश ही पंचमहाभूते विश्वनिर्मितीचे कारण मानले जाते. म्हणूनच सूर्याला सूर्यनारायण, धरित्रीला माता, वाऱ्याला वायुदेव, पाण्याला पर्जन्यदेव तर आकाशाला विश्वब्रम्हांड मानेले जाते. हेच परमेश्वराचे व्यक्तरुप आहे अशी श्रध्दा दिसून येते. पंचमहाभूते आणि सृष्टीचक्राचा अनुबंध सांगताना 'दासबोधात' समर्थ म्हणतात,

**'पंचभूते झाले जग**
**पंचभूतांची लगबग ।**
**पंचभूते गेलियां मग**
**काय आहे ।।'**

हे जग पंचमहाभूतांमुळेच निर्माण झाले आहे. ती नसतल तर राहिलेच काय ? असे संत रामदासांना वाटते. कृषिसंस्कृती आणि पंचमहाभूतांचे महत्व यातूनच पर्यावरणसंवेदन अर्थातच निसर्गसंवेदन आकारास आलेले दिसून येते. वृक्ष, वल्ली, डोंगर, पाने, फुले, फळे, पशू, पक्षी, नदी, चंद्र, सुर्य, तारे, पाऊस, वने इत्यादी निसर्गसंवेदन देणारे घटक संतसाहित्यात आढळून येतात. निसर्गातील या सर्व घटकांना उपमा, रुपक, सिध्दांत, दृष्टांत अशा स्वरुपात वापर करुन संत साहित्यातील निसर्गसंवेदन आढळून येते. संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यांतही निसर्गसंवेदन विपुल प्रमाणात दिसून येते.

**वसंत तेथे वने**
**वन तेथे सुमने**
**सुमनी पालिंगने**

**सारंगाची**
**गुरु तेथे ज्ञान**
**ज्ञानी आत्मदर्शन**
**दर्शनी समाधान**
**आर्थि जैसे**

जेथे वसंत ऋतू आहे तेथे झाडांना पाने, फुले, फळे आलीच. तेथे फुले भ्रमरांचे गुंजन असतेच तसेच तेथे गुरु तेथे ज्ञान, जेथे ज्ञान तेथे आत्मदर्शन आणि जेथे आत्मदर्शन तेथे समाधान आपोआप येते. भ्रमर फुलांकडे जसे परागकण गोळा करण्यास येतात तसे साधकांनी ज्ञानी माणासाकडे ज्ञानसंपादन करण्यास यावे या दृष्टांतातून संत ज्ञानेश्वर वृक्षाला ज्ञानी पुरुषाच्या समान उभे करतात. तसेच ज्ञानी पुरुषाला वृक्षाला समान उभे करतात. संत ज्ञानेश्वरांनी निसर्गसंवेदनेला नैतिक बोधाचे कोंदण दिलेले दिसून येते. संत ज्ञानेश्वर वृक्षाला स्थितप्रज्ञ म्हणून गौरवितात. सर्वांभूती समदृष्टी ठेवणारी व्यक्ती आणि वृक्ष एक समान आहेत असे
संत ज्ञानेश्वरांना वाटते.

**'जो या खांडवया घावो घाली**
**का लावणी जयाचे केली**
**दोघां एकीच साउली**
**वृक्षु दे जैसा ।**

वृक्ष जो त्याला तोडण्याच्या हेतूने त्यांच्यावर घाव घालतो आणि जो पाणी घालून त्याला वाढवतो त्या दोघांना समान सावली देतो. मित्र आणि शत्रू असा भेदभाव न करता सर्वाविषयी समभाव ठेवणे हे वृक्षाचे लक्षण आहे तसेच ते स्थितप्रज्ञ व्यक्तीचे अर्थात संताचे लक्षण आहे. वृक्ष, पशु, पक्षी, फुले, भ्रमर या निसर्गघटकांचे संत ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंग ओवीतून विपूलप्रमाणात केले आहे. संत ज्ञानेश्वरांना कावळा हा शुभशकुनाचा पक्षी वाटतो. जो पाहुण्याच्या आगमनाचा संदेश देतो. म्हणूनच ते म्हणतात, 'पैलतोगे काऊ कोकताहे... शकुन गे माये सांगताहे...' तसेच चातक, मोर या पक्षांचाही उल्लेख त्यांच्या अभंग ओव्यातून दिसून येतो. मेघांचा दृष्टांन्तही ज्ञानेश्वरांनी अनेकदा दिला आहे. मेघाडे उदारपण अधोरेखित करताना संत ज्ञानेश्वर निसर्गसंवेदनेव्दारे मेघ, पाऊस, चातक या निसर्गघटकातून ईश्वराच्या कृपेचा वर्षाव कसा होतो
याचा दृष्टांत देतात.

**'जी मेघ आपुलीये प्रोढी**
**जगाची आर्ती दवडी**
**वाचुनी चातकाची तहान केवढी**
**तो वर्शावो पाहुनी'**

चकोरपक्षी पोर्णिमेच्या चंद्राचेच चांदणे पिऊन जगतो परंतु त्या चकोरासाठी का होईना चंद्र आपल्या शीतल अमृत किरणांचा वर्षाव समस्त पृथ्वीतलावर करतो. त्याचप्रमाणे चातकपक्षीही पावसाची वाट पाहत थांबलेला असतो. वास्तविक चातकाची तहान किती कमी असणार परंतु त्याच्या तहानेसाठी मेघ बरसतो आणि संपूर्ण जगाची तहान त्यामुळे भागली जाते. ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी मेघ, पावसाचा उल्लेख आहे.

**'तरी अवसात माधवी ।**
**त हेतु होय नव पल्लवी**
**पल्लव पुश्पपुंज दावी**
**पुष्प फळाते ।।**
**का वर्शिये आणिजे मेघु**
**मेघ वृष्टीप्रसंगु**

**वृष्टीस्तव भोगु**
**सस्यसुखाचा'**

मेघ वर्षावाने समृध्दी होते. वर्षाऋतू मेघ पाऊस आणतात. पाने, फुले, फळे बहरतात. धनधान्याची समृध्दी होते. परंतु त्यासाठी वर्षाऋतूतले मेघ हवे असतात. कारण वर्षाऋतूच्या मेघात पर्जन्यक्षमता दडलेली असते.

मराठी संत साहित्यात दिसून येणारे निसर्गसंवेदनेचे स्वरुप नैतिक व तात्वीक स्वरुपाचे आहे. संत साहित्यात संत ज्ञानेश्वरांच्या काव्यात निसर्गसंवेदन विपुलप्रमाणात आहे. जे दृष्टांत, रुपकाच्या माध्यमातून येते. संत रामदासांचे 'दासबोधा' तील निसर्गसंवेदन कृतिशील उद्‌बोधनाला प्राधान्य देते. मानवी जीवनात डोंगर पर्वतांना अन्यनसाधारण महत्व आहे. कारण त्यांना मेघराजाचे वस्तिस्थान मानन्यात आले आहे. उंच डोंगर व दाट झाडी मेघांना अडवून धरते. तेव्हाच पाऊस पडू शकतो. मानवी जगण्याची समृध्दता व सुफलताही पर्जन्यवृष्टीवर अवलंबून असल्यामुळे पर्यावरण संतुलनात डोंगर –पर्वताचे महत्व सांगुन समर्थ रामदास पर्यावरण संतुलन राखण्याचे उद्‌बोधन करतात. ते म्हणतात– 'जितुके गिरी तितुक्या धारा । कोसळती भयंकरा ; पर्वत हेच नदीच्या उगमाचे स्थान आहेत. पर्वतामुळेच संपूर्ण भूतलावर समृध्दी आणणाऱ्या नदया दुधडी भरुन वाहतात.

**'नदया पर्वताहून कोसळल्या**
**नाना सांकडीमध्ये रिचवल्या**
**धबाबां खळाखळा चालील्या**
**असंभव्य'**

जितके दाट पर्वत राई, तितकी दाट जंगले आलीच. त्यामुळे पर्जन्यवृष्टी सहजपणे होते. पर्यावरणाच्या रक्षणासाठी संत रामदास पर्वतांचे महत्व अधोरेखित करतात.

संत एकनाथांनीही पर्वताची परोपकारीवृत्ती विशद करताना म्हटले आहे. 'रत्नादि निकर समस्त । पर्वतपरार्थीचे वाहात ।तृणजक नाना अर्थ । तेही परार्थ धरीतसे ।' पर्वत हे परोपकारी वृत्तीचे प्रतिक आहेत. पर्वताच्या उदरात असलेल्या रत्नांच्या खाणी तो जगाला देऊन टाकतो. त्याच्यावर वाढणारे गवत, त्यांच्यावर पडणारे पाणीही तो मुक्त हस्त देतो. निसर्ग लोकजीवनाच्या समृध्दीसाठी भरभरुन देतो. संत एकनाथाना वाटते मानवांजीवनावर निसर्गाचे अनंत उपकार आहेत. संत एकनाथ म्हणतात,

**'त्या पर्वता ऐसी तत्वता**
**टसावी साधकाची उदारता**
**काया वाचा आणि चित्ता**
**सर्वस्व देता उल्हासु**
**परमार्थाचिया चाडा**
**स्वार्थ सांडोनी रोकडा**
**परोपकारार्थ अवघडा**
**रिघे साकडा परार्थे'**

संत सावतामाळी यांनी 'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी । लसुण मिरची कोर्थिबिरी । अवघा झाला माझा हरी । असे म्हटले आहे. निसर्ग हाच परमेश्वर आहे. शेतीतल्या पिकातून, धनधान्यातून विठ्ठल शोधणाऱ्याला निसर्ग परमेश्वराची अनुभुती देतो.

संत साहित्यात आलेले पक्षांचे संदर्भही एका अनोख्या निसर्गसंवेदनेचा आविष्कार करतात. कोकिळ, पिंगळा, चातक, कावळा, पावशा, मोर या पक्षांचे उल्लेख संतसाहित्यात आढळून येतात. संत एकनाथांनी पोपट, पाखरु, वटवाघुळ, टिटवी इ. पक्षी तर विंचू, गाय, एडका, कुत्रे ही पशुविषयक रुपये वापरली आहेत. संत साहित्यातील पक्षांच्या उल्लेखावरुन दिसून येते की, हे पक्षी पर्यावरणाचे दूत आहेत. 'पैल तोगे काऊ कोकताहे' असं म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांसाठी कावळा हा पाहुणे येणार हे सांगणारा, शकुन सांगणारा पक्षी आहे. पिंगळा हा पक्षी निसर्गातील घडामोडींची जाणिव करुन देणारा पक्षी आहे. पिगळयाचे सांकेतिक संकेत घेऊन 'पिंगळा' नावाचा

बहुरुपी लोकजीवनात पहाटे येवून निसर्गातील घडामोडींचे भविष्यवजा सुचन करीत असे. नाथ महाराज पिंगळयावरील रुपकात म्हणतात, 'पिंगळा महाव्दारी । बोली बोलतो देखा । शकुन सांगतो तुम्हा । हा एक ऐका ।। पिंगळयावरील रुपकातून मानवी मनाचे समर्पक चित्रण एकनाथांनी केले आहे. समर्थ रामदासांनी पर्यावरणाचा नाश झाल्यावर कोणते संकट ओढवेल याचे भविष्यकालीन संकेत पिंगळयाच्या रुपकातून केले आहेत.

संत साहित्यातील निसर्गसंवेदन हे परमार्थाच्या विचारातून व्यक्त झाल्यान ते सांकेतिक व संकल्पनात्मक राहिले. संत साहित्यातील निसर्गसंवेदन जाणिवपूर्वक पर्यावरणीय दृष्टीकोनातून अस्तित्वात आले नसल्यामुळे ते जीवनदृष्टीचा जगण्याचा एक घटक म्हणून अस्तित्वात आले, तरीही पर्यावरणीय प्रबोधनाची बीजे याच संत साहित्यात आढळून येतात.

## निष्कर्ष :—

1. संत साहित्यातील निसर्गसंवेदनेची, पर्यावरणीय जाणिवेची बीजे भारतीय संस्कृतीतील पंचमहाभूतांना परमेश्वस्वरुप मानन्याच्या तत्वविचारात दिसून येतात.
2. मराठी संत साहित्यातून दिसूण येणारे निसर्गसंवेदनेचे स्वरुप नैतिक व तात्विक स्वरुपाचे आहे.
3. मराठी संत साहित्यातील निसर्गसंवेदन अमूर्त व संकल्पनात्मक आशय असलेले असले तरी ते इंद्रियगोचर आहे.
4. संत तुकाराम निसर्गसंवदनेला नैतिक बोधाचे कोंदण देतात तर संत रामदासाचे निसर्गसंवेदन कृतीशील उद्बोधनाला प्राधान्य देते.
5. संत तुकारामाच्या अभागातील निसर्गसंवेदन नीतिबोध करते.
6. संत साहित्यातील निसर्गसंवेदन परमार्थाच्या विचारातून व्यक्त झाल्याने ते सांकेतिक व संकल्पनात्मक राहिले असले तरी पर्यावरणीय प्रबोधनाची बीजे याच निसर्गसंवेदनेत दिसून येतात.

## संदर्भग्रंथ :—


1. श्री सार्थ ज्ञानेश्वरी — ह.भ.व.प. मामासाहेब दांडेकर
2. श्री सार्थ दासबोध — संपा. ह.भ.प.ल.रा.पांगारकर
3. तुकाराम गाथा — संपा. नरहरी विष्णुशास्त्री पणशीकर
4. सकल संत गाथा भाग 1 व 2 — संपा. श्री.का. अ. जोशी